आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१३ डिसेंबर २०२५ - शनिवार

**ठळक बातम्या**

- संसदेवरच्या दहशतवादी हल्ल्यात शहीद झालेल्यांना देशाची श्रद्धांजली

- बार्टी, सारथी, सारख्या संस्थांच्या योजनांसाठी मार्गदर्शक तत्वं निश्चित करण्याचं उपमुख्यमंत्री अजित पवार यांचं आश्वासन

- आगामी महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांसाठी उमेदवारी अर्ज ऑफलाईन दाखल करता येणार

आणि

- लोकसभेचे माजी सभापती आणि माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील - चाकूरकर यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार

<><><><><>

संसदेवर दहशतवादी हल्ला झाल्याला आज २४ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त या हल्ल्यात शहीद झालेल्यांना देश श्रद्धांजली वाहत आहे. २००१ मध्ये झालेल्या या हल्ल्यात संसदेचं रक्षण करताना हौतात्म्य पत्करलेल्या सुरक्षा रक्षकांना राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी श्रद्धांजली वाहिली असून या शूरवीरांनी दाखवलेलं धैर्य, साहस आणि समर्पणाला राष्ट्र अभिवादन करत आहे, त्यांची कर्तव्यनिष्ठा देशाच्या राष्टभावनेला सदैव मार्गदर्शन करत राहील, असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, केंद्रीय मंत्री पीयूष गोयल, जितेंद्र सिंह आणि इतर नेत्यांनी आज संसद भवन परिसरात शहिदांना श्रद्धांजली अर्पण केली. लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी, काँग्रेस नेत्या सोनिया गांधी आणि इतर संसद सदस्यांनीही हुतात्म्यांना पुष्पांजली वाहिली. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षण मंत्री राजनाथ सिंग, परराष्ट्रव्यवहार मंत्री डॉ. एस जयशंकर यांनीही शहीदांना श्रद्धांजली अर्पण केली आहे.

<><><><><>

युद्ध आणि युद्धाचं तंत्र एका मोठ्या क्रांतीच्या उंबरठ्यावर असून भारतीय संरक्षण दल या बदलत्या वातावरणाशी जुळवून घेण्यासह नवीन सुधारणा आत्मसात करण्यासाठी सज्ज आहे, असं संरक्षण दल प्रमुख जनरल अनिल चौहान यांनी म्हटलं आहे. हैद्राबाद मध्ये आयोजित सामायिक दीक्षांत संचलन कार्यक्रमाला ते आज संबोधित करत होते. मजबूत संस्था, स्थिर लोकशाही आणि आपल्या सशस्त्र दलांची दृढ व्यावसायिकता ही भारतीय सैन्याची बलस्थानं आहेत, असं ते म्हणाले. ऑपरेशन सिंदूरची तीव्रता जरी कमी झाली असली तरी ते अद्याप सुरु असल्याचं त्यांनी सांगितलं.

<><><><><>

राज्यातल्या रस्त्यांच्या कामासाठी दीड लाख कोटी रुपये मंजूर करण्यात आल्याचं केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी सांगितलं. हे काम पुढल्या तीन महिन्यात सुरू होईल, असं ते म्हणाले. विधानपरिषदेच्या शताब्दी सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी होण्यासाठी ते आज नागपुरात विधानभवन परिसरात गेले होते, त्यावेळी त्यांनी वार्ताहरांशी संवाद साधला. महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ १६ हजार ३१८ कोटी रुपयांचा पुणे ते संभाजीनगर महामार्ग बांधणार असून यासाठीच्या सामंजस्य करारावर स्वाक्षरी झाली. या मार्गामुळे पुणे ते छत्रपती संभाजीनगरमधलं अंतर दोन तासांनी तसंच नागपूर ते छत्रपती संभाजीनगरमधलं अंतर अडीच तासांनी कमी होईल, असं गडकरी म्हणाले. त्याचप्रमाणे सध्याच्या मुंबई-पुणे द्रुतगती मार्गाला समांतर असणाऱ्या १५ हजार कोटी रुपये खर्चाच्या द्रुतगती मार्गामुळे दोन्ही शहरातलं अंतर दीड तासांनी कमी होईल, असंही गडकरी यांनी सांगितलं. ४ हजार २०७ कोटी रुपयांच्या तळेगाव-चाकण-शिक्रापूर मार्गाचं भूमिपूजन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका संपल्यानंतर केलं जाईल, पुणे विभागातल्या ५० हजार कोटी रुपयांच्या कामांना मंजुरी दिली असून पुढल्या तीन महिन्यात हे कामही सुरू होईल, असं गडकरी यांनी सांगितलं.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी येत्या सोमवारपासून जॉर्डन, इथिओपिया आणि ओमान या तीन देशांच्या दौऱ्यावर जाणार आहेत. या दौऱ्यात ते, जॉर्डनचे राजे अब्दुल्ला बिन अल हुसेन यांच्या निमंत्रणावरून येत्या 15 ते 16 डिसेंबर दरम्यान जॉर्डनला भेट देतील. भारत

हा जॉर्डनचा तिसरा सर्वात मोठा व्यापारी भागीदार आहे. तर 16 ते 18 डिसेंबर दरम्यान मोदी आधी  इथिओपियाला आणि नंतर ओमानला भेट देणार आहेत.

<><><><><>

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आज छत्तीसगढ मध्ये रायपूर इथं महत्त्वपूर्ण बैठक घेणार असून नक्षलवादाचं उच्चाटन करण्याच्या दृष्टीनं सुरु असलेल्या प्रयत्नांचा आढावा घेणार आहेत. या बैठकीला छत्तीसगढचे मुख्यमंत्री विष्णुदेव साय, उपमुख्यमंत्री विजय शर्मा आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार आहेत. त्यांनतर अमित शाह बस्तर ऑलिंपिकच्या सांगता समारंभात देखील सहभागी होणार आहेत.

<><><><><>

बार्टी, सारथी, महाज्योती, अमृत यासारख्या स्वायत्त संस्थांद्वारे अंमलबजावणी होणाऱ्या योजनांच्या कार्यपद्धतीत पारदर्शकता आणली जाईल तसंच योग्य निकषांसह मार्गदर्शक तत्वे निश्चित केली जातील, असं आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज विधानसभेत दिलं. या संस्थांची शिष्यवृत्ती ३ वर्षांपासून रखडली असल्याचा प्रश्न डॉ. नितीन राऊत यांनी विचारला होता, त्यावर ते बोलत होते. आर्थिकदृष्ट्या दुर्बल-वंचित घटकांतल्या, परदेशात शिक्षण घेण्याची क्षमता नसलेल्या जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना प्राधान्यानं मदत करण्याचा सरकारचा उद्देश असल्याचेही अजित पवार म्हणाले.

सामाजिक न्याय विभागाच्या वसतीगृहाच्या सुरक्षेतली गैरव्यवस्था आणि अनियमितता याबाबत क्रिस्टल कंपनीला ५५ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. तसंच साफसफाईबाबत कारणे दाखवा नोटीस बजावली असल्याची माहिती सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाठ यांनी दिली. उत्तमराव जानकर यांनी विचारलेल्या प्रश्नावर ते उत्तर देत होते.

<><><><><>

आगामी महानगरपालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांसाठी ऑफलाईन उमेदवारी अर्ज दाखल करता येईल, असं महाराष्ट्र राज्य निवडणूक आयुक्त दिनेश वाघमारे यांनी आज सांगितलं. आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राजकीय पक्षांच्या प्रतिनिधींसोबत राज्य निवडणूक आयोगाची आज मुंबईत बैठक झाली, त्यावेळी वाघमारे बोलत होते. त्यादृष्टीने राज्य निवडणूक आयोगानं २९

महानगरपालिका, ३२ जिल्हा परिषदा आणि ३३६ पंचायत समित्यांच्या निवडणुकांचं नियोजन केलं आहे.

संभाव्य दुबार मतदारांसंदर्भात राज्य निवडणूक आयोगाने सर्व संबंधित महानगरपालिका आयुक्त आणि जिल्हाधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिकेने संभाव्य दुबार मतदारांचा शोध घेण्यासाठी स्वतंत्र संगणक प्रणाली विकसित केली आहे. त्याद्वारे आणि घरोघरी जाऊन संभाव्य दुबार मतदारांचा शोध घेण्याची दक्षता घेण्यात येत आहे. त्याचबरोबर मतदार यादीतील नाव शोधण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाने maha sec voterlist.in हे संकेतस्थळ उपलब्ध करून दिल्याचं वाघमारे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

राज्यात प्रक्रिया उद्योग उभे राहण्याची गरज असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. नागपूर इथं सीआयआय अन्न प्रक्रिया परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी ते आज बोलत होते. या परिषदेमधे विविध विषयांवर चर्चा होईल, तसंच प्रक्रिया उद्योग क्षेत्रात प्रगती करण्यासाठी धोरणं आखली जातील, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. वातावरण बदलामुळे शेतीवर झालेला परिणाम हे आपल्यासमोरील मोठं आव्हान आहे, ज्या क्षेत्रात मूल्यवर्धन आहे तिथे शेतकरी बाजारावर प्रभाव टाकू शकतात, मात्र जिथे मूल्यवर्धन नाही तिथे शेतकऱ्यांच्या पिकाला योग्य भाव मिळत नाही, असं मुख्यमंत्री म्हणाले. त्यामुळे उत्पादनांचं मूल्यवर्धन करून प्रक्रिया उद्योग परिसंस्था बळकट करण्याची गरज मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

अमरावती इथल्या श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या वतीने देण्यात येणारा प्रतिष्ठेचा 'डॉ. पंजाबराव देशमुख स्मृती पुरस्कार' यंदा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जाहीर झाला आहे. राजकीय, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांच्या उल्लेखनीय कार्याचा गौरव म्हणून हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी आज अमरावती इथं पत्रकार परिषदेत ही घोषणा केली.

पंजाबराव देशमुख यांच्या जयंतीनिमित्त आयोजित महोत्सवात विदर्भातील शेतकऱ्यांचाही सन्मान करण्यात येणार आहे. ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी दिलेल्या निधीतून

शेतीक्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी महिलेला ‘शारदाबाई पवार उत्कृष्ट महिला शेतकरी पुरस्कार’, तर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या निधीतून पुरूष शेतकऱ्याला ‘शरद जोशी उत्कृष्ट पुरूष शेतकरी पुरस्कार’ देण्यात येणार आहे. १ लाख रुपये रोख, स्मृतिचिन्ह आणि सन्मानपत्र असं या दोन्ही पुरस्कारांचे स्वरूप आहे तर पाच लाख रुपये रोख, स्मृतिचिन्ह, मानपत्र, शाल आणि श्रीफळ असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना देण्यात येणाऱ्या पुरस्काराचं स्वरूप आहे.

<><><><><>

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्यावर आज लातूरच्या वरवंटी इथल्या त्यांच्या शेतात शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. आज सकाळी लातूरमधल्या निवासस्थानापासून त्यांच्या अंत्ययात्रेला सुरुवात झाली. औसा रस्ता, छत्रपती शिवाजी महाराज चौक, बार्शी रस्ता, पाच नंबर चौक, एमआयडीसी मार्गे हीयात्रा वरवंटी इथं पोहोचली. संरक्षण राज्यमंत्री संजय सेठ, लोकसभेचे सभापती ओम बिर्ला, काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, ज्येष्ठ नेते शरद पवार, खासदार अशोक चव्हाण, काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांच्यासह इतर अनेक नेत्यांनी शिवराज पाटील यांचं अंत्यदर्शन घेतलं. विधानसभेतही आज अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी शिवराज पाटील चाकुरकर यांच्या निधनाबद्दल शोकप्रस्ताव मांडला आणि सर्व सदस्यांनी दोन मिनिटं शांतता पाळून चाकुरकर यांना आदरांजली वाहिली.

<><><><><>

अनधिकृत गौण खनिज उत्खननप्रकरणी राज्य सरकारनं ४ तहसिलदार, ४ मंडळ अधिकारी आणि २ तलाठ्यांना निलंबित केलं आहे. पुणे जिल्ह्यातल्या मावळ तालुक्यात वनीकरणासाठी राखीव असलेल्या क्षेत्रातून ९० हजार ब्रास अनधिकृत गौण खनिजाच्या उत्खनन प्रकरणी ही कारवाई झाली आहे.

//<><><><><>//